नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/११/२०२६ (सोमवार)

एमआयडीसी बुटीबोरी भागातील मुख्य मार्गावरील रस्ते सुरक्षा उपाययोजनांची अंमलबजावणी;
नागपूर ग्रामीण पोलीसांच्या पुढाकाराला महामेट्रोकडून सकारात्मक प्रतिसाद

एमआयडीसी बुटीबोरी भागातील मुख्य मार्गावर सुरू असलेल्या बांधकामादरम्यान निर्माण झालेल्या रस्ते सुरक्षाविषयक समस्यांची गंभीर दखल घेत मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीसांनी अपघातांना प्रतिबंध करण्यासाठी पुढाकार घेतला. नागपूर ग्रामीण पोलीसांनी केलेल्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) यांनी सुचविण्यात आलेल्या सुरक्षा उपाययोजनांची अंमलबजावणी करून सुरक्षा उपयोजना केल्या आहे.

नमुद मार्गावर जानेवारी ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत झालेल्या रस्ते अपघातांमध्ये ६ जणांचा मृत्यू झाला होता. सदर मार्गावर सुरू असलेल्या बांधकामामुळे वाहनचालक आणि इतर रस्ते वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध धोके निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी सुमारे ४.१ किलोमीटर लांबीच्या या मार्गावरील रस्ते सुरक्षेच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले.

दिनांक २३/०९/२०२६ रोजी याच मार्गावर बसच्या धडकेत सागर पद्माकर लोखंडे यांचा मृत्यू झाला होता. या अपघातप्रकरणी बुटीबोरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, तपासादरम्यान बसचालकासह रस्ते सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजना करण्यात दुर्लक्ष केल्याच्या अनुषंगाने जी. आर. इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड या बांधकाम कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर यांना सदर गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे.

अपघातांची वाढती संख्या आणि बांधकामामुळे निर्माण होणारे संभाव्य धोके लक्षात घेऊन नागपूर ग्रामीण पोलीसांनी संबंधित रस्ता प्राधिकरण असलेल्या महामेट्रोकडे रस्ते सुरक्षेच्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. रस्ते सुरक्षा तज्ज्ञांच्या तांत्रिक सहकार्याने या मार्गाची सविस्तर पाहणी व सुरक्षा मूल्यांकन करण्यात आले. त्यानंतर वाहनचालकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक अभियांत्रिकी सुधारणा आणि सुरक्षा उपाययोजनांची शिफारस महामेट्रोकडे करण्यात आली. यामध्ये १. बांधकाम क्षेत्रात योग्य बॅरिकेडिंग व वाहतूक व्यवस्थापन करणे, २.रात्रीच्या वेळी रस्त्याची दृश्यमानता वाढविण्यासाठी **Reflective Hazard Markers** बसविणे,३. आवश्यक ठिकाणी **Road Marking,Road Studs** व **Delineators** बसविणे, ४. संभाव्य धोक्यांची पूर्वसूचना देण्यासाठी दिशादर्शक व सूचना फलक लावणे.तसेच बांधकामामुळे निर्माण होणारे संभाव्य धोके ओळखून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अशा सुधारणा आणि सुरक्षा उपाययोजनांची शिफारस महामेट्रोकडे करण्यात आली होती

नागपूर ग्रामीण पोलीसांनी केलेल्या पाठपुराव्याला प्रतिसाद देत महामेट्रोने या शिफारशीनुसार आवश्यक रस्ते सुरक्षा उपाययोजनांची अंमलबजावणी पूर्ण केली आहे. या कामाबद्दल नागपूर ग्रामीण पोलीसांनी महामेट्रोचे आभार मानले असून, रस्ते सुरक्षेच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन शिफारशीनुसार आवश्यक कामे वेळेत पूर्ण केल्याबद्दल महामेट्रोच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे.


TAKE
DIVERSION
DIVERSION
DIVERSION
GO SLOW
Keep Distance
motorola edge 60 fusion
13 Oct 2026 5:20 pm


WORK IN PROGRESS
GO SLOW
G P INFRAPROJECTS LIMITED
महामेट्रो
RESTRICTED AREA
प्रतिबंधित क्षेत्र
motorola edge 60 fusion
13 Oct 2026 5:03 pm


DIVERSION
SLOW
12:37
02 Nov 2026
Mon, 31°C
Butibori MIDC Main Road, Butibori MIDC, Butibori MIDC, 441108, Maharashtra
Lat/Long: 20.928347°N, 78.994383°E
Photo by
Timeprint


VERSION
DIVERSION
DIVERSION
Photo by
Timeprint



दारूच्या नशेत भरधाव पिकअप वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या आरोपीविरूद्ध सदोष मनुष्यवधचा गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक ०१/११/२०२६ रोजी काटोल पोलीस स्टेशन येथे फिर्यादी सौ. कोमल अमोल परतेकी, वय २५ वर्ष, रा. मांगली, त. हिंगणा, जि. नागपूर यांनी फिर्याद दिली की, दिनांक ३१/१०/२०२६ रोजी मौजा काटोल मुर्ती रोड परसोडी शिवार येथे फिर्यादी हीचे वडील मृतक नामे मुकुंद मारोती मडावी, हे काटोल ते मुर्ती जाणाऱ्या रस्त्याने पायी जात असताना परसोडी ते पंचमवाडी दरम्यान रस्ता ओलांडत होते. त्याचवेळी काटोलकडून येणाऱ्या पिकअप वाहन क्रमांक एम. एच.— ४०/सि.एम. २९९६ चा चालक **आरोपी उमेश दिलीप येणुरकर, वय ३९ वर्ष, रा. लाडगाव, त. काटोल, जि. नागपूर** याने दारूच्या नशेत वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून रस्त्यावरील पादचारी मुकुंद मडावी यांना जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांना डोक्याला व चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना पुढील वैद्यकीय उपचारकामी ग्रामीण रूग्णालय काटोल येथे आणले असता

डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. सदर वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांच्या तसेच स्वत:च्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, याची जाणीव असतानाही त्याने दारूच्या नशेत वाहन चालविल्याने फिर्यादीच्या वडीलाचे मरणास आरोपी हा कारणीभूत झाला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपी उमेश दिलीप येणुरकर, वय ३९ वर्ष, रा. लाडगाव, त.काटोल, जि. नागपूर याचे विरूद्ध कलम २८१, १०५ भान्यासं, सहकलम १८४, १८५ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०५ गुन्हे दाखल,

दिनांक ०१/११/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०५ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन वेलतूर येथे आरोपी नामे भिमराव अभिमान गोंडाणे, वय ६२ वर्ष, डोंगरमौदा, ता. कुही, जि.नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे राम वासूदेव कोल्हाड, वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र ०३, धापेवाडा कळमेश्वर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे रामदास किसना चौरे वय ४२ वर्ष रा. तिनखेडा तह. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण ४३२० मिली देशी दारू, ४२ लीटर मोहाफुल दारू, ११०० लिटर सडवा, इतर साहित्य असा एकुण ३९,६८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर